13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# बाबासाहेबांनी खऱ्या सामाजिक इतिहासावर प्रकाशझोत टाकला

## पी. कन्नान : विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाच्या चर्चासत्राला प्रारंभ

**कोल्हापूर :** बाबासाहेबांनी आपल्या लिखाणातून भारताच्या खऱ्या सामाजिक इतिहासावर प्रकाशझोत टाकला आहे. बिनतोड युक्तिवादांसह त्यांनी केलेल्या सैद्धान्तिक मांडणीला आजही पर्याय नाही, असे प्रतिपादन विजापूरमधील राज्य महिला विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी. कन्नान यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे होते. अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहातील या चर्चासत्राचा विषय 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' असा आहे.

डॉ. कन्नान म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनाचे विविध प्रवाह समजून घेण्याकरिता आयुष्यातील बहुतेक वेळ विद्याभ्यासात घालविला. विषमतेच्या परिस्थितीत त्यांनी केलेले सामाजिक, आर्थिक न्यायावरील कार्य फार महान आहे.

डॉ. मोरे म्हणाले, ज्ञानाची ताकद काय असते, हे बाबासाहेबांनी आपल्या कार्यातून जगाला दाखवून दिले. कार्यक्रमात प्रा. कन्नान यांच्या हस्ते चर्चासत्राच्या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, बल्लारी विद्यापीठाचे बसवराज एस. बन्नी, डी. एम. भंडारी, डॉ. प्रवीण जाधव, आर. जी. दांडगे, आदी उपस्थित होते.

अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी सूत्रसंचालन केले. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. डॉ. पी. कन्नान यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन झाले. यावेळी डावीकडून एस. टी. कोंबडे, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. जे. एफ. पाटील, बसवराज बन्नी उपस्थित होते.

### अर्थशास्त्रात मोलाचे कार्य

अर्थशास्त्राच्या प्रत्येक शाखेत बाबासाहेबांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान करणे शक्य असते. त्यातूनच जागतिक परिवर्तन घडवून आणता येते, असे प्रा. पी. कन्नान यांनी सांगितले.

13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# शिक्षणातूनच परिवर्तनाचे चक्र गतिमान : कन्नान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान करणे शक्य असते. त्यातूनच जागतिक परिवर्तन घडवून आणता येते, असे प्रतिपादन विजापूर (कर्नाटक) येथील राज्य महिला विद्यापीठाचे इंग्रजी अधिविभागप्रमुख प्रा.डॉ. पी. कन्नान यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रास आजपासून सुरुवात झाली. या चर्चासत्राच्या बीजभाषणात डॉ. कन्नान बोलत होते. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी बीसीयूडी संचालक डॉ. डी.आर. मोरे होते.

डॉ. कन्नान म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनाचे विविध प्रवाह समजून घेण्याकरिता आयुष्यातील बहुतेक वेळ विद्याभ्यासात घालविला. त्यातूनच शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तनासाठी समाजाचे सबलीकरण करणे ही महत्त्वाची गरज असल्याचे

## शिवाजी विद्यापीठात डॉ. आंबेडकर राष्ट्रीय चर्चासत्र

त्यांचे मत बनले होते. त्यांनी आपल्या लिखाणातून भारताच्या खऱ्या सामाजिक इतिहासावर प्रकाशझोत टाकला आहे. पूर्वीच्या काळी सर्वांना शिक्षण घेणे शक्य नव्हते, अशा विषमतेच्या परिस्थितीत त्यांनी केलेले सामाजिक, आर्थिक न्यायावरील कार्य फार महान आहे. अर्थशास्त्राच्या प्रत्येक शाखेत त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहे.

डॉ. मोरे म्हणाले, ज्ञानाची ताकद काय असते, हे जगाला बाबासाहेबांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. संविधानाच्या माध्यमातून इथल्या प्रत्येक नागरिकाला शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला. अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक, डॉ.व्ही.पी.कट्टी यांनी सूत्रसंचालन आणि समन्वयक एस.टी. कोंबडे यांनी आभार मानले.

यावेळी बल्लारी विद्यापीठाचे बसवराज एस. बन्नी, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डी.एम. भंडारी, डॉ. प्रवीण के. जाधव, डॉ.आर.जी. दांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017
तरुण भारत

# प्रवाशांच्या संवेदनशीलतेतून उत्तम साहित्य निर्मिती



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय हिंदी परिषदेचे उद्घाटन करताना गुलशन सुखलाल, प्रा. गोपीनाथन, डॉ. शंकरलाल पुरोहित, प्रा. पद्मा पाटील आदी.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

प्रवासी भारतीयांच्या संवेदनशीलतेमधून जागतिक स्तरावर उत्तम साहित्यकृतींची निर्मिती झाली आहे, असे प्रतिपादन मॉरिशस येथील विश्व हिंदी सचिवालयाचे माजी उपमहासचिव गुलशन सुखलाल यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागातर्फे आयोजित 'प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वर्ध्याच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. जी. गोपीनाथन होते.

सुखलाल म्हणाले, स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषतः १९५० नंतर भारतीय लोक विविध कारणांनी देशाबाहेर जाऊ लागले. अर्थार्जनाबरोबरच अनेक उद्दिष्टे त्यांच्या स्थलांतरामागे होती. अशा प्रकारे जागतिक प्रवासी बनत असताना त्यांची भारतीय विचारपद्धती आणि मूलभूत अधिकाराविषयीची सजगता त्यांच्यात जागृत होती. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या घडामोडींकडे ते त्यांच्या भारतीयत्वाच्या नजरेतून अत्यंत सजगपणे व संवेदनशीलपणे पाहत होते. साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्तीचे आयाम लाभले. ते समजून घेण्यासाठी प्रवासी हिंदी साहित्याचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. मॉरिशसमध्ये प्रवासी हिंदी साहित्याची निर्मिती जोमदारपणे झालेली आहे. या साहित्याचा आणि त्यामागील प्रेरणांचा अभ्यास होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रा. गोपीनाथन म्हणाले, प्रवासी साहित्यातून भाषेला महत्त्वाची देणगी जर कोणती मिळत असेल तर ती शब्दभांडाराची होय. प्रवासी साहित्याचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. पद्मा पाटील यांनी स्वागत केले.

13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# प्रवासी भारतीयांच्या संवेदनातून उत्तम साहित्य

## सुखलाल : 'प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार'वरील आंतरराष्ट्रीय परिषदेस सुरवात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : प्रवासी भारतीयांच्या संवेदनशीलतेमधून जागतिक स्तरावर उत्तम साहित्यकृतींची निर्मिती झाली आहे, असे प्रतिपादन मॉरिशस येथील विश्व हिंदी सचिवालयाचे माजी उपमहासचिव गुलशन सुखलाल यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागात आजपासून 'प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार' विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेस सुरवात झाली. त्यावेळी ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धाच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. जी. गोपीनाथन होते.

श्री. सुखलाल म्हणाले, "स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषतः १९५० नंतर भारतीय लोक विविध कारणांनी देशाबाहेर जाऊ लागले. अर्थार्जनाबरोबरच अनेक उद्दिष्टे त्यांच्या स्थलांतरामागे होती. अशा प्रकारे जागतिक प्रवासी बनत असताना त्यांची भारतीय विचारपद्धती आणि मूलभूत अधिकारांविषयीची सजगता त्यांच्यात जागृत होती. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या घडामोडींकडे ते त्यांच्या भारतीयत्वाच्या नजरेतून संवेदनशीलपणे पाहत होते.

प्रा. गोपीनाथन म्हणाले, "प्रवासी साहित्यातून भाषेला महत्त्वाची देणगी जर कोणती मिळत असेल तर ती शब्दभांडाराची होय. देशोदेशींचे विविध भाषांतील प्रचलित शब्द हिंदी साहित्यात येतात आणि त्यांच्या माध्यमातून भाषा समृद्ध होण्यास बळ मिळते. प्रवासी साहित्याचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय."

तत्पूर्वी 'शोध' या डिजिटल संशोधन पत्रिकेचे गुलशन यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. पद्मा पाटील यांनी प्रास्ताविक केले. या परिषदेच्या आयोजनाची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. प्रदीप लाड यांनी आभार मानले. परिषदेस अमेरिका, त्रिनिदाद अँड टोबॅगो, नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस येथील संशोधक उपस्थित आहेत.

> **'मॉरिशसमध्ये प्रवासी हिंदी साहित्याची निर्मिती जोमदारपणे झालेली आहे. या साहित्याचा आणि त्यामागील प्रेरणांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.**
> **- गुलशन सुखलाल**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आंतरराष्ट्रीय हिंदी परिषदेचे उद्‍घाटन करताना गुलशन सुखलाल, प्रा. गोपीनाथन, डॉ. शंकरलाल पुरोहित, प्रा. पद्मा पाटील आदी.**

13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# संवेदनशीलतेमधून उत्तम साहित्यकृतींची निर्मिती

## गुलशन सुखलाल यांचे मत : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय हिंदी परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रवासी भारतीय हे आपली मातृभूमी, आपले लोक व भाषा यापासून दूर असले तरी त्यांनी हे संबंध राखण्याचा प्रयत्न कायम ठेवला आहे. त्यामुळेच जागतिक स्तरावर प्रवासी भारतीयांच्या संवेदनशीलतेमधून उत्तम साहित्यकृतींची निर्मिती झाली असल्याचे मत मॉरिशस येथील विश्व हिंदी सचिवालयाचे माजी उपमहासचिव गुलशन सुखलाल यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागात 'प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे सुखलाल यांच्या हस्ते आज उद्घाटन झाले. त्यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. जी. गोपीनाथन होते.

सुखलाल म्हणाले, १९५० नंतरच्या काळात भारतीय लोकांनी शिक्षण, नोकरी, व्यवसायानिमित्त देशाबाहेर स्थलांतर सुरू केले. अर्थार्जनाबरोबरच अनेक उद्दिष्टे त्यांच्या स्थलांतरामागे होती. ही भारतीय मंडळी जागतिक प्रवासी बनत असताना त्यांची भारतीय विचारपद्धती आणि मूलभूत अधिकारांविषयीची सजगता जागृत दिसून येते. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या घडामोडींकडे ते त्यांच्या भारतीयत्वाच्या नजरेतून अत्यंत सजगपणे व संवेदनशीलपणे पाहात होते. या साऱ्यांमुळे त्यांची जी मानसिक, सामाजिक आणि आर्थिक स्तरावर जडणघडण, गुंतागुंत होत राहिली, तिला साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्तीचे आयाम लाभले. ती समजून घेण्यासाठी प्रवासी हिंदी साहित्याचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आयोजित आंतरराष्ट्रीय हिंदी परिषदेचे उद्घाटन रोपट्यास पाणी घालून करताना गुलशन सुखलाल. व्यासपीठावर प्रा. गोपीनाथन, डॉ. शंकरलाल पुरोहित प्रा. पद्मा पाटील आदी.

### संपूर्ण परिषद डिजिटल

हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. पद्मा पाटील यांनी परिषदेच्या सुरुवातीस स्पष्ट केले की आयोजनाची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात आली आहे. त्यामुळे एकाअर्थाने ही परिषद महत्त्वपूर्ण आणि वेगळी आहे.

प्रा. गोपीनाथन म्हणाले, प्रवासी साहित्यातून हिंदी भाषेला शब्दभांडाराची विस्तृत देणगी लाभली आहे. देशोदेशींचे विविध भाषांतील प्रचलित शब्द हिंदी साहित्यात येतात आणि त्यांच्या माध्यमातून भाषा समृद्ध होण्यास बळ मिळते. प्रवासी साहित्याचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये होय. संशोधक डिजिटल संशोधन पत्रिकेचे गुलशन यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या दोनदिवसीय परिषदेस डॉ. शंकरलाल पुरोहित आदींसह अमेरिका, त्रिनिदाद अॅन्ड टोबॅगो, नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस येथील संशोधक उपस्थित आहेत. डॉ. प्रदीप लाड यांनी आभार मानले.

13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# संवेदनशीलतेतूनच उत्तम साहित्यकृती

## गुलशन सुखलाल : विद्यापीठातील हिंदी विभागाची परिषद

**कोल्हापूर** : प्रवासी भारतीयांच्या संवेदनशीलतेमधून जागतिक स्तरावर उत्तम साहित्यकृतींची निर्मिती झाली आहे, असे प्रतिपादन मॉरिशसमधील विश्व हिंदी सचिवालयाचे माजी उपमहासचिव गुलशन सुखलाल यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषाभवनातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा. जी. गोपीनाथन होते. 'प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार' असा परिषदेचा विषय आहे. सुखलाल म्हणाले, स्वातंत्र्योत्तर कालखंडात १९५० नंतर भारतीय लोक विविध कारणांनी देशाबाहेर जाऊ लागले. आपली मातृभूमी, आपले लोक, भाषा यांपासून ते दूर असले, तरी त्यांनी हे संबंध राखण्याचा प्रयत्न कायम ठेवला.

### प्रवासी मानत नाही

आपण स्वत:ला प्रवासी किंवा स्थलांतरित मानत नसल्याचे सुखलाल यांनी सांगितले. ते म्हणाले, मॉरिशसमध्ये प्रवासी हिंदी साहित्याची निर्मिती जोमदारपणे झालेली आहे. या साहित्याचा आणि त्यामागील प्रेरणांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

प्रा. गोपीनाथन म्हणाले, प्रवासी साहित्यातून भाषेला महत्त्वाची देणगी जर कोणती मिळत असेल, तर ती शब्दभांडाराची होय. कार्यक्रमात 'शोध' या डिजिटल संशोधन पत्रिकेचे गुलशन यांच्या हस्ते प्रकाशन झाले. हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. पद्मा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रदीप लाड यांनी आभार मानले. परिषदेत अमेरिका, त्रिनिदाद एन्ड टोबॅगो, नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस येथील संशोधक सहभागी आहेत. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017

लोकमत

## विद्यापीठातील शुद्धिकरण केंद्राचे आज उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने पाणी शुद्धिकरण केंद्र उभारले आहे. त्याचे उद्घाटन आज, शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता महानगरपालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे असतील. विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या मागे हे पाणी शुद्धिकरण केंद्र उभारण्यात आले आहे.

13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# विद्यापीठात 'नॅक'संदर्भात आज कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व के.आय.टी. अभियात्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन वे परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थावर होणारा परिणाम' या विषयावर शुक्रवार १३ राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.

नॅक, बेंगलोर यांच्या वतीने ही राष्ट्रीय परिषद प्रायोजित केली असून आधुनिक जगाचा विचार करता शैक्षणिक संस्थांचे परीक्षण व मुल्यांकन ही गुणवत्ता



सुधारण्यासाठी महत्वाची बाब बनली आहे. या परिषदेसाठी प्रमुख पाहूणे म्हणून चेन्नई येथील आण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, भुषविणार आहेत. विविध सत्रांमध्ये डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. एस. वाय. होनगेकर आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. पहिल्या दिवसाचे सत्र शिवाजी विद्यापीठात होणार असून दि. १४ जानेवारी रोजी दुसरे सत्र के.आय.टी. महाविद्यालयात होणार आहे. या सत्रात डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, विद्यापीठाच्या आय.क्यु.ए.सी.चे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. सी. के. कोकाटे हे मार्गदर्शन करणार आहेत. विविध विषयावर मार्गदर्शन होईल. चर्चासत्राचा समारोप बेळगांव येथील के.एल.ई. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. के. कोकाटे उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017
पुण्यनगरी

# आजपासून 'नॅक' राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ व केआयटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १३ व १४ जानेवारी रोजी करण्यात आले आहे.

ही परिषद नॅकच्या वतीने प्रायोजित केली आहे. आधुनिक जगाचा विचार करता शैक्षणिक संस्थांचे परीक्षण व मूल्यांकन ही गुणवत्ता सुधारण्यासाठी महत्त्वाची बाब बनली आहे. दि. १३ जानेवारी रोजी या परिषदेचे उद्घाटन आण्णा विद्यापीठ, चेन्नईचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी यांच्या हस्ते होणार आहे. डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. एस. वाय. होनगेकर या मान्यवरांची मार्गदर्शनपर व्याख्याने होणार आहेत. पहिल्या दिवसाची सर्व सत्रे शिवाजी विद्यापीठात पार पडणार आहेत. दि. १४ जानेवारी रोजीची सर्व सत्रे केआयटी कॉलेज येथे, तर दुसऱ्या दिवशी डॉ. व्ही. व्ही. कार्जित्री, डॉ. आर. के. कामत, डॉ. सी. के. कोकाटे यांची मार्गदर्शनपर तज्ज्ञ व्याख्याने होतील. तज्ज्ञ व्याख्यानांमध्ये बेस्ट प्रॅक्टिसेस, शोध, विद्यार्थी प्रगती व संशोधन अशा विषयांवर मार्गदर्शन होईल. केआयटीमध्ये या परिषदेचा समारोप होईल. समारोपासाठी केएलई विद्यापीठ, बेळगावचे कुलगुरू डॉ. सी. के. कोकाटे हे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017
लोकमत

# 'नॅक परीक्षण' बाबत आजपासून राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व केआयटी कॉलेजतर्फे 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन, परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावरील राष्ट्रीय परिषद आज, शुक्रवारी आणि उद्या, शनिवारी होणार आहे.

परिषदेचे उद्घाटन विद्यापीठात सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. बंगलोरच्या 'नॅक'च्या सहकार्याने होणाऱ्या परिषदेच्या उद्घाटनास चेन्नईतील अण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी हे प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे असतील.

या परिषदेतील विविध सत्रांमध्ये डॉ. बी. एम. हिर्डेकर, एस. वाय. होनगेकर, आदी मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात आज 'नॅक' परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व केआयटी कॉलेजच्यावतीने नॅक राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावर ही परिषद होत आहे. १३ व १४ जानेवारी असे दोन दिवस होणाऱ्या परिषदेचा पहिला दिवस शिवाजी विद्यापीठात, तर दुसरा दिवस केआयटी कॉलेजमध्ये असणार आहे. उद्घाटन चेन्नईच्या अण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी यांच्या हस्ते होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

फास्ट न्यूज

## विद्यापीठाच्या सामंजस्य करारांना मान्यता

**कोल्हापूर :** नवीन वर्षात शिवाजी विद्यापीठ इस्त्राईल येथील हॅप युनिव्हर्सिटी व पुणे येथील भारतीय शुगरबरोबर होणाऱ्या सामजस्य करारांना गुरुवारी व्यवस्थापन परिषदेत मान्यता देण्यात आली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचा फायदा व्हावा, यासाठी शिवाजी विद्यापीठ देशविदेशातील संस्थांशी सामजस्य करार करत आहे. कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धिंगत होत आहे. यासाठी इस्त्राइल येथी हॅपी युनिव्हर्सिटी व भारतीय शुगरबरोबर करार करण्यास मान्यता दिली. अर्थशास्त्र विभागाच्यावतीने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यासाठी मान्यता दिली. याचेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017
सकाळ

# विज्ञान दिनानिमित्त विद्यापीठात स्पर्धा

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभाग व कन्सोर्शियम ऑफ नेचर कन्झर्वेटर्स सोसायटीतर्फे (कोनॅक) राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त १५ व २२ जानेवारीला सर सी. व्ही. रमन स्पर्धा होत आहे. सकाळी सहा ते दुपारी चार या वेळेत वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी हॉलमध्ये निबंध, चित्रकला, रांगोळी, प्रश्नमंजूषा, फोटोग्राफी व वैज्ञानिक प्रकल्प गटात स्पर्धा होईल. स्पर्धेत पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी व अकरावी ते पदवीस्तर असे गट आहेत. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी प्रा. सुनील पाटील, प्रा. गणेश वाघमारे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# दहा हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर टाइम्स टीम



इंजीनिअरिंग, एमसीएम, एमसीएस आणि एमसीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी येणाऱ्या 'सीड आयटी आयडल' उपक्रमाची सुरुवात झाली आहे. उपक्रमातंर्गत शिवाजी विद्यापीठ अतंर्गत ४० कॉलेजमध्ये स्पर्धा सुरू झाली असून अंतिम फेरी तीन मार्च रोजी शिवाजी विद्यापीठ येथे होणार आहे. रोजगार निर्मितीला चालना देणाऱ्या उपक्रमाचे आयोजन सीड इन्फोटेक व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे, अशी माहिती सीड इन्फोटेकच्या कार्यकारी संचालिका भारती बऱ्हाटे यांनी दिली.

बऱ्हाटे यांनी सांगितले की, 'सीड इन्फोटेकच्यावतीने राज्यात हा उपक्रम घेण्यात येत आहे. राज्यातील बहुतांशी विद्यापीठे या उपक्रमामध्ये सहभागी होत आहेत. कोल्हापुरात हा उपक्रम शिवाजी विद्यापीठाच्यावतीने राबवण्यात येत आहे. संगणकशास्त्र विषयाशी संबंधित विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या माध्यमातून एक व्यासपीठ मिळणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील दहा हजार विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. स्पर्धेची पहिली फेरी फेब्रुवारीच्या अखेरीस होणार आहे. त्यानंतर दुसरी व अंतिम फेरी तीन मार्चमध्ये होणार आहे. अंतिम फेरीनंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण करण्यात येणार आहे.'

**'सीड आयटी' स्पर्धेची अंतिम फेरी मार्चमध्ये होणार**

शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. पी. एन. भोसले म्हणाले, 'कोणत्याही उद्योगांमध्ये काम करण्यासाठी विद्यार्थी ज्ञान आणि कौशल्याने परिपूर्ण आणि सज्ज असला पाहिजे. ही काळाजी गरज आहे. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यापीठ व विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांना सहायभूत ठरणार आहे. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत मुलाखत तंत्र आणि सभाधीटपणा निर्माण होणार आहे.' पत्रकार बैठकीस मंदार जोग उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2017
Times of India

# Varsity joins hands with private firm to test IT skills

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University Kolhapur (SUK) has joined hands with a private firm SEED Infotech, in an effort to improve the computer skills of the students.

The firm will organize the SEED IT Idol 2017 competition—the first round of which will be held at varsity affiliated colleges. The test, according to the firm officials, will be based on the basic computer skill, which is part of the IT industries' regular recruitment process.

P N Bhosale, counsellor and placement officer, at SUK, said, "We always boost competitions which will help the students get ready for the industry, as it is the need of the hour. We are happy that an organisation like SEED infotech ltd., is working towards this and helping in skill development required for the future industrial applications."

He added, "We have sent letters to all the colleges affiliated with SUK to participate in the competition and like every year, we are sure to get a good response from students."

Bhosale added that such events can help the students improve their skills. "It helps them in getting industry-ready, which is the need of the hour," he said.

"The university provides soft-skill training through various expert lectures and workshops and this is one of the initiatives," he added.

Speaking about the initiative Bharati Barhate, executive director, SEED Infotech said that last year more than 65,000 students had appeared for the test from across the state. We are seeking respective university's support from different parts of the state for more participation and have been getting a good response so far, she said.

According to Barhate, the initiative will be undertaken in the cities like Pune, Mumbai, Baramati, Sangli, Solapur, Nashik, Amaravati, Nagpur, Dhule and Ratnagiri, apart from Kolhapur.

13 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# मराठीच्या संवर्धनाची संधी

## विश्वकोश अद्ययावतीकरणात ज्ञानमंडळाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाचाही सहभाग

mahesh.pati
@timesgroup.com
Tweet : @MaheshpMT

**कोल्हापूर :** माझे मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। हे संत ज्ञानेश्वरांचे बोल सार्थ ठरवत 'मराठी' भाषेतील ज्ञान संवर्धनाच्या, विस्ताराच्या प्रक्रियेने काहीशी गती घेतली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने सुरू केलेल्या विश्वकोश अद्ययावतीकरणाच्या कार्यात महाराष्ट्रातील मुंबई, नाशिकच्या मुक्त विद्यापीठासह अनेक संस्थांच्या बरोबरीने सहभागाची संधी शिवाजी विद्यापीठाला नुकतीच मिळाली. विश्वकोश निर्मिती मंडळाशी झालेला सामंजस्य करार हे यानिमित्ताने पडलेले एक चांगले पाऊल म्हणता येईल.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणाच्या सुरू असलेल्या प्रकल्पात लोक सहभागाचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न चालवला आहे. विश्वकोश निर्मिती मंडळाने आखलेल्या धोरणानुसार महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे, साहित्य क्षेत्रातील संस्थांना या प्रकल्पात सहभागी करून घेण्यात आले आहे. 'ज्ञानमंडळ' या संकल्पनेच्या माध्यमातून विद्यापीठे, साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामवंत संस्था या प्रकल्पाशी जोडल्या जातील. मंडळातर्फे निर्मिती केल्या जाणाऱ्या विश्वकोश खंडांमधील नोंदींचे अद्ययावतीकरण, विविध विषयांवरील नव्या माहितीची भर टाकणे हे या ज्ञानमंडळांचे उद्दिष्ट असेल. त्यातही प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करण्याची दूरदृष्टी महामंडळाने दर्शविली आहे. नंतरच्या टप्प्यात सर्व ज्ञानमंडळे परस्परांशी जोडणे व त्या आधारे विश्वकोशाची पुढील रचना करणे, हा उद्देश मंडळाचा आहे. त्यासाठी संबंधित संस्था आणि महामंडळ यांच्यात 'सामंजस्य करार' करण्याची प्रकिया सध्या सुरू आहे. मुंबई विद्यापीठ, डेक्कन इन्स्टिट्यूट, नाशिकचे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्यासह महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या संस्थांशी जोडून घेण्यात आले आहे. याच प्रक्रियेअंतर्गत शिवाजी विद्यापीठात आधुनिक इतिहास, राज्यशास्त्र आणि मराठी साहित्य या तीन



मटा सिटीस्कॅन

शिक्षण




विषयांची ज्ञानमंडळे स्थापन करण्यात आली आहेत. शिवाजी विद्यापीठ या उपक्रमात आधुनिक इतिहास, राज्यशास्त्र आणि मराठी साहित्य या विषयांत ज्ञानमंडळ म्हणून जबाबदारी पार पाडणार आहे. त्यासाठीचा सामंजस्य करार नुकताच करण्यात आला. विश्वकोश निर्मिती मंडळ मराठी विश्वकोशाच्या २० खंडांधमधील नोंदींचे अद्ययावतीकरण करीत आहे. या प्रक्रियेत कालबाह्य झालेल्या नोंदींची निश्चिती केली जाणार आहे. याशिवाय, विद्यमान नोंदींचे पुनर्लेखन, नव्या नोंदी लिहून घेणे असे काम केले जाणार आहे. यात विविध विषयांचा समावेश असेल. प्राथमिक टप्प्यातील या कामानंतर जगभरातील अद्ययावत माहितीच्या आधारे नोंदी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू ठेवली जाईल. त्यासाठी आता स्थापन करण्यात येत असलेली ज्ञानमंडळे ही महत्त्वाची ठरतील. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ असे धोरण मंडळाचे आहे. सर्व ज्ञानमंडळे मराठी विश्वकोशाशी जोडली जावीत असा प्रयत्न मंडळाचा आहे.मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या संस्थांची निवड करणे, त्यांना ज्ञानमंडळ म्हणून आपल्याशी जोडून घेणें हा ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंकलन आणि ज्ञानसंवर्धन यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. ज्ञानमंडळांच्या माध्यमातून मराठी विश्वकोश निर्मितीसाठी माहितीची देवाण-घेवाण होईलच, मात्र त्यातून समाजही जोडला जाईल हे निश्चितच महत्त्वाचे. मराठी विश्वकोशाच्या ज्ञानमंडळ या प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाने मराठी, इतिहास आणि राज्यशास्त्र या तीन विषयांशी स्वत:ला जोडून घेतले आहे. तिन्ही अधिविभागांच्या माध्यमातून ज्ञानाचे आदान-प्रदान, अद्ययावतीकरणासाठीचे काम चालणार आहे.

आजच्या घडीला पसरलेले नवतंत्रज्ञान आणि ज्ञानाची वाढत असलेली व्याप्ती, होत असलेला विस्तार लक्षात घेता मराठीच्या संवर्धनाला एका गतीची आवश्यकता होती. जागतिक स्तरावर विविध ज्ञानशाखांमध्ये प्रचंड ज्ञानभांडार उपलब्ध आहे. फक्त गरज आहे ती, हे ज्ञान मराठी भाषेत आणण्याची. त्यासाठी विविध विद्यापीठांमधील, सामाजिक, साहित्यिक संस्थांमधील तज्ज्ञांना सामावून घेण्याचा विश्वकोश निर्मिती मंडळाचा उपक्रम हे एक पुढचे पाऊल म्हटले पाहिजे. यातून मराठी भाषेत ज्ञानाचे नवे भांडार खुले होलच, शिवाय त्या-त्या ज्ञानशाखेतील संस्थांचा संवाद आणि लोकसहभाग वाढणार आहे. ज्ञानाच्या आदान-प्रदानासाठीचे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.